# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट क्र-६२ दिनांक - २७/०२/२०२४

## सोनसाखळी चोरी करणाऱ्या सराईत आरोपीतांना अटक करण्यात विरार पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.

विरार पोलीस ठाणे हद्दीत दि.२१/०२/२०२४ रोजी २१:००वा.चे सुमारास मनवेलपाडा सिग्नल जवळ, निदान लॅब समोर, विरार-नालासोपारा लिंक रोड, विरार(पु.), ता.वसई, जि.पालघर येथे तक्रारदार हे पायी चालत जात असतांना, निदान लॅब समोर आले असता, एका अनोळखी इसमाने धक्का देवुन, तक्रारदार यांस धक्का मारके उपरसे सॉरी नही बोला, असे बोलुन, कॉलर पकडून धक्का-बुक्की करुन गळयातील सोन्याची चैन जबरीने हिसकावुन घेवुन, त्याचे जवळ आलेल्या एका सफेद रंगाच्या स्कुटीवर बसुन पळुन गेले बाबत तक्रारदार- श्री.वासुदेव म्हात्रे वय ६४ वर्षे रा.अष्टविनायक ग्रह, फुलपाडा, विरार(पु.), ता.वसई यांचे तक्रारीवरुन विरार पो.ठाणे, गु.रजि.नं. I १७५/२०२४, भा.दं.वि.सं. कलम-३९४, ३४ प्रमाणे दि.२२/०२/२०२४ रोजी गुन्हा नोंद केला आहे.

सदर गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेवुन, मा.वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांनुसार विरार गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी लागलीच घटनास्थळी भेट देवुन, घटनास्थळी मिळालेल्या सी.सी.टी.व्ही. फुटेज व आरोपीताची एम.ओ.बी. याचे आधारे सदरचा गुन्हा हा आरोपीत-अज्जु ऊर्फ अजगर खान, रा.भिवंडी यानेच केला असल्याचे निष्पन्न झाल्याने, नमुद आरोपीताचा भिवंडी परिसरात गुप्त बातमीदार व तांत्रिक माहितीचे आधारे शोध घेत असतांना, सदरचा आरोपीत हा भिवंडी-वाडा रोडवरील यशवंत ढाबा येथे येणार असल्याची खात्रीशिर बातमी मिळाल्याने, लागलीच सदर ठिकाणी सापळा रचुन, शिताफतीने सराईत आरोपीत नामे. **१)अज्जु ऊर्फ अजगर खान, वय-४३ वर्षे, २)मिराज अहमद अन्सारी, वय-३३ वर्षे, ३)जमाल अन्सारी, वय-३८ वर्षे**, सर्व रा.भिवंडी, जि.ठाणे यांना २४ तासात ताब्यात घेवुन, प्रस्तुत गुन्हयात दि.२३/०२/२०२४ रोजी अटक करण्यात आली आहे. नमुद आरोपीतांचे चौकशी दरम्यान त्यांचेकडून एकुण-२० **ग्रॅम सोन्याचे चैन**, असा **एकुण- १,१०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल** हस्तगत करुन, सदरचा गुन्हा उघडकीस आला आहे.

नमुद सराईत आरोपीत नामे. **१)अज्जु ऊर्फ अजगर खान, वय-४३ वर्षे**, याचेवर खालील नमुद गुन्हे दाखल आहेत.

| अ.क्रं. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. व कलम |
|---|---|---|
| १ | भिवंडी शहर पो.ठाणे | ०१/२०१७ भा.दं.वि.सं.कलम-४३८,३०७,३२५,१४७,१४८,१४९,५०४ सह म.पो.अधि.कलम १३५(१) प्रमाणे |
| २ | भिवंडी शहर पो.ठाणे | १२०२/२०१७ भा.दं.वि.सं.कलम ४५२,१४३,१४७,१४९,३२३ प्रमाणे |
| ३ | भिवंडी शहर पो.ठाणे | ११४९/२०१४ भा.दं.वि.सं.ककम ३२४,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| ४ | भिवंडी शहर पो.ठाणे | २२६/२००४ भा.दं.वि.सं.कलम ३७९, ३४ प्रमाणे |
| ५ | भिवंडी शहर पो.ठाणे | १२२४/२००२ भा.दं.वि.सं.कलम ३९४,३४ प्रमाणे |
| ६ | भिवंडी शहर पो.ठाणे | ९७/२००० भा.दं.वि.सं.कलम ३७९,३४ प्रमाणे |
| ७ | भिवंडी शहर पो.ठाणे | ३७/१९९८ भा.दं.वि.सं.कलम ३९४,३४ प्रमाणे |
| ८ | वालीव पोलीस ठाणे | ३६५/२०१९ भा.दं.वि.सं.कलम ३७९,३४ प्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| ९ | विरार पोलीस ठाणे | ५०९/२०२३, भा.दं.वि.सं.कलम ३९२, ३४ प्रमाणे |

सदरची कामगिरी श्री.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री.रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे श्री.विजय पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.सुशिलकुमार शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. ज्ञानेश फडतरे, पो.उप.निरी. अविनाश हाटखिळे, पो.हवा. सचिन लोखंडे, संदिप जाधव, विशाल लोहार, इंद्रनिल पाटील, संदिप शेरमाळे, पो.अं.संदिप शेळके, मोहसिन दिवान, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, रोशन पुरकर, दत्तात्रय जाधव, प्रफुल सोनार, तसेच पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, कार्यालयाचे पो.हवा.नामदेव ढोणे, व पो.अं.संतोष खेमनर, यांनी यशस्वीरित्या पार पाडलेली आहे.

